ePaper
"पाचवी कोणाकडे आणि घुगऱ्या कोण करतंय.. ", तटकरे यांचा गोगावले यांना टोला

| वर्ष - 9 | अंक -119 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | मंगळवार, दि. 23 डिसेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



## आतील पानांत

- धोनीमुळे करिअर उद्‌ध्वस्त झालं
- महिला क्रिकेटर वैष्णवी शर्माचे पदार्पण
- भाजपाकडून लोकशाहीवर हल्ला
- नक्षलवादी हल्ल्यात काँग्रेसचा हात!

### 'गद्दारी' नरेटिव्हला छेद — नगरनिवडणुकांत शिंदेसेनेची मोठी झेप

# भाईंचा 'देवाभाऊ पॅटर्न' यशस्वी!

## भाजप पाठोपाठ दुसऱ्या स्थानावर मजल; ठाकरेसेनेवर सलग तिसऱ्यांदा वरचढ

। पुणे । प्रतिनिधी ।
महाईन्यूज



**नगर पंचायत आणि नगर परिषदेच्या निवडणुकांचे निकाल जाहीर होताच राज्याच्या राजकारणात नवे समीकरण स्पष्ट झालं आहे. अपेक्षेप्रमाणे भारतीय जनता पक्षानं या निवडणुकांत पहिला क्रमांक पटकावला, मात्र सर्वाधिक लक्ष वेधून घेतली ती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेनं. भाजपच्या पाठोपाठ दुसऱ्या स्थानावर झेप घेत शिंदेसेनेनं केवळ ठाकरे गटालाच नव्हे, तर संपूर्ण महाविकास आघाडीला मोठा धक्का दिला आहे. विशेष म्हणजे महाविकास आघाडीतील तीनही पक्ष मिळूनही शिंदेसेनेइतक्याही जागा जिंकू शकले नाहीत. शिवसेना विरुद्ध शिवसेना (उबाठा) या संघर्षात शिंदे यांनी पुन्हा एकदा आपलं वर्चस्व ठामपणे सिद्ध केलं आहे.**

या निवडणुकांमध्ये अनेक ठिकाणी भाजपनं स्वबळाचा नारा दिला होता. काही ठिकाणी स्थानिक पातळीवर वेगळी समीकरणं जुळवण्यात आली. त्यामुळे शिंदेसेनेसाठी ही निवडणूक सोपी नव्हती. भाजपसोबत युती नसतानाही आपण स्वतंत्रपणे मुसंडी मारू शकतो का, हीच खरी परीक्षा शिंदेंसमोर होती. या परीक्षेत शिंदे पूर्णपणे यशस्वी ठरले. नगर पंचायत आणि नगर परिषदांच्या निकालांनी 'शिंदेसेना भाजपच्या यंत्रणेमुळेच जिंकते' हा दावा मोठ्या प्रमाणावर खोडून काढला आहे.

### 'लहान' निवडणूक नसते, याची जाणीव

कोणतीही निवडणूक छोटी नसते, याचा प्रत्यय या निकालांनी पुन्हा एकदा दिला. सत्तेत असलेल्या महायुतीतील तिन्ही प्रमुख पक्षांनी या निवडणुकांसाठी कमालीची ताकद लावली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी अक्षरशः झंझावाती प्रचार केला. गेल्या महिनाभरात हे तीनही नेते राज्यभर पायाला भिंगरी लावल्यासारखे फिरत होते. प्रचाराच्या रणांगणात विरोधक कुठेच दिसत नव्हते. त्याचं प्रतिबिंब थेट निकालात उमटलं. भाजप पहिल्या क्रमांकाचा पक्ष ठरला, शिंदेसेना दुसऱ्या क्रमांकावर पोहोचली, तर अजित पवारांची राष्ट्रवादी तिसऱ्या स्थानी राहिली.

### ताकद दाखवण्याचं आव्हान

२०२२ मध्ये शिवसेनेत झालेल्या ऐतिहासिक फाटाफुटीनंतर शिंदे आणि ठाकरे यांच्यातील राजकीय लढाई अधिक तीव्र झाली. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांत शिंदेसेनेनं स्ट्राईक रेटच्या बाबतीत ठाकरेसेनेपेक्षा चांगली कामगिरी केली होती. मात्र नगर पंचायत आणि नगर परिषदांच्या निवडणुकांत भाजप अनेक ठिकाणी सोबत नसणार, हे स्पष्ट होतं. त्यामुळे शिंदेंसमोर नवं आव्हान उभं राहिलं होतं. भाजपसोबत नसतानाही आपली संघटनात्मक ताकद, कार्यकर्त्यांचं जाळं आणि नेतृत्व क्षमता सिद्ध करावी लागणार होती.

या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री असलेले एकनाथ शिंदे यंदा प्रथमच अनेक ठिकाणी भाजपशिवाय मैदानात उतरले. त्यांनी प्रचाराचा अक्षरशः धडाका लावला. शिंदे यांनी तब्बल ५३ प्रचारसभा घेतल्या, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३७ सभांना संबोधित केलं. अनेक ठिकाणी शिंदेंसाठी थेट भाजपचं आव्हान होतं. तळकोकणात निलेश राणे आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यात थेट संघर्ष झाला. हिंगोलीत संतोष बांगर, सांगोल्यात शहाजी बापू पाटील यांना स्थानिक भाजप नेत्यांनी अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला. मात्र शिंदे या सगळ्या नेत्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले. 'आपला माणूस' ही प्रतिमा त्यांनी या निवडणुकांत अधिक ठळक केली.

### 'देवाभाऊ पॅटर्न'चा प्रभाव

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्थानिक नेत्यांनीच लढवायच्या, जिल्हा पातळीवर लक्ष द्यायचं, असा २०१४ पूर्वीचा पारंपरिक पॅटर्न होता. मात्र २०१४ मध्ये मुख्यमंत्री झाल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी हा पॅटर्न पूर्णपणे बदलला. गल्लीपासून दिल्लीपर्यंत, निवडणूक कोणतीही असो, ती अत्यंत गांभीर्यानं लढायची, प्रचारात कोणतीही कसर ठेवायची नाही, हा नवा पॅटर्न त्यांनी रूढ केला. त्यांच्या पहिल्याच टर्ममध्ये फडणवीस यांनी जवळपास सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये बारकाईनं लक्ष घातलं. प्रचारसभांचा अक्षरशः धडाका लावला. त्याचाच परिणाम म्हणून भाजप राज्यातील पहिल्या क्रमांकाचा पक्ष ठरला. त्यावेळी फडणवीस सरकारमध्ये उद्धव ठाकरे यांची शिवसेना सत्तेत होती. मात्र उद्धव ठाकरे यांचा प्रचाराचा जोर तुलनेनं मर्यादित होता. शिंदे यांनी मात्र पक्षाची सूत्रं हाती येताच हा 'देवाभाऊ पॅटर्न' अंगीकारला. स्थानिक नेत्यांना ताकद दिली, संसाधनं पुरवली, आणि स्वतः मैदानात उतरून कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. भाजपशी स्पर्धा करायची असेल, तर त्यांच्याच पद्धतीनं २४ तास राजकारण करावं लागेल, ही जाणीव शिंदेंना फार लवकर झाली. त्यामुळेच नगर पंचायत आणि नगर परिषदांच्या निवडणुकांत त्यांनी प्रचाराचा तुफान उघडला.

### 'गद्दारी' नरेटिव्हला छेद

लोकसभा, विधानसभा आणि आता नगर पंचायत-नगर परिषद अशा सलग तीन निवडणुकांत शिंदेसेनेनं ठाकरेसेनेवर मात केली आहे. शिंदेंविरोधात सातत्यानं वापरलं जाणारं 'गद्दारी'चं नरेटिव्ह आता मागे पडताना दिसत आहे. कार्यकर्ते, स्थानिक नेते आणि मतदारांपर्यंत शिंदे यांची 'काम करणारा नेता' ही प्रतिमा अधिक ठळकपणे पोहोचली आहे. सलग तीन निवडणुकांत स्ट्राईक रेटच्या बाबतीत ठाकरेंना मागे टाकणं, हे केवळ आकड्यांचं यश नाही, तर बदललेल्या राजकीय वास्तवाचं द्योतक आहे.

## स्ट्राईक रेटच्या राजकारणात शिंदेंची सरशी

राज्यातील सलग तीन निवडणुकांचे निकाल पाहता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेतील फूटीनंतरची राजकीय अग्नीपरीक्षा यशस्वीपणे पार केल्याचं स्पष्ट होत आहे. गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत शिंदेंच्या पक्षाने १५ जागा लढवून ७ जागा जिंकल्या, तर उद्धव ठाकरे गटाने २१ जागांपैकी ९ जागांवर विजय मिळवला. खासदारांची संख्या ठाकरेंकडे अधिक असली तरी स्ट्राईक रेटमध्ये शिंदे आघाडीवर राहिले. शिंदेंचा स्ट्राईक रेट ४६.७ टक्के होता, तर ठाकरे गटाचा ४२.९ टक्के राहिला. लोकसभेनंतर सहा महिन्यांनी झालेल्या विधानसभा निवडणुकीत चित्र पूर्णपणे बदललं. उद्धवसेनेला ९५ पैकी केवळ २० जागा मिळाल्या आणि स्ट्राईक रेट २१ टक्क्यांवर घसरला. याउलट शिंदेसेनेनं ८१ जागा लढवून ५७ जागा जिंकत भक्कम कामगिरी केली. त्यानंतर झालेल्या नगरपंचायत आणि नगरपरिषद निवडणुकांमध्येही शिंदेसेनेनं अर्धशतक पार करत भाजपनंतर दुसरा क्रमांक मिळवला. 'गद्दारी'चा आरोप मागे टाकत शिंदेंनी स्वतःची स्वतंत्र ताकद सिद्ध केली असून, भाजपच्या मदतीशिवायही यश मिळवता येतं, हे त्यांनी या निवडणुकांतून दाखवून दिलं आहे.

## दुर्घटनेत १६ जण जखमी

## औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांकडून टेम्पो जप्त

# भेसळयुक्त भंडारा विक्रेत्यांवर कारवाई

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**जेजुरीत खंडोबा गडाच्या पायथ्याशी लागलेल्या भंडाऱ्याच्या आगीच्या दुर्घटनेत दोन नगरसेविकांसह १६ जण जखमी झाल्याच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर अन्न आणि औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी जेजुरीत भेसळयुक्त भंडारा विक्री करणाऱ्यांविरोधात कारवाईची मोहीम सुरू केली. त्यामध्ये भंडाऱ्याची पोती असलेला एक टेम्पो सोमवारी सायंकाळी जप्त केला.**

## जखमींच्या प्रकृतीत सुधारणा



अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अन्नसुरक्षा अधिकारी क्रांती बारवकर, रजिया शेख, लक्ष्मीकांत सावळे, डॉ संदीप शिंदे यांच्या पथकाने ही कारवाई केली. या कारवाईच्यावेळी जेजुरी पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे उपस्थित होते. पकडण्यात आलेल्या टेम्पोतील भंडाऱ्याचे नमुने पुढील तपासणीसाठी पाठवण्यात येणार असल्याची माहिती अन्नसुरक्षा अधिकारी क्रांती बारवकर यांनी दिली. नगरपरिषदेच्या निवडणुकीत विजयी झालेले उमेदवार रविवारी खंडोबा गडाच्या पायथ्याशी दर्शनासाठी आले होते. यावेळी औक्षण करताना मोठ्या प्रमाणात उधळलेल्या भंडाऱ्यामुळे आगीचा भडका उडाला. त्यामध्ये २ नगरसेविकांसह १६ जण जखमी झाले. यातील २ जणांना घरी सोडण्यात आले आहे. मात्र, १४ जणांवर उपचार सुरू आहेत. जखमींची प्रकृती सुधारत असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते माउली खोमणे यांनी दिली.जेजुरीत मोठ्या प्रमाणात भेसळयुक्त भंडारा येतो. हा भंडार भाविकांच्या आरोग्याला अपायकारक असून कालची दुर्घटना ही गंभीर आहे. येथे वर्षाकाठी खंडोबाच्या आठ मोठ्या यात्रा भरतात. लाखो लोक जेजुरीत येतात. गडावर भाविक पेटवलेल्या दिवट्या घेऊन तळी भंडारा करीत असतात. त्यामुळे केमिकलयुक्त बनावट भंडारा बनवणाऱ्या कंपन्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर व विक्रेत्यांवर तातडीने कारवाई व्हावी, अशी मागणी श्री मार्तंड देव संस्थानचे मुख्य विश्वस्त मंगेश घोणे यांनी केली आहे.जेजुरीत खंडोबा गडाच्या पायथ्याशी लागलेल्या भंडाऱ्याच्या आगीच्या दुर्घटनेत दोन नगरसेविकांसह १६ जण जखमी झाल्याच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर अन्न आणि औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी जेजुरीत भेसळयुक्त भंडारा विक्री करणाऱ्यांविरोधात कारवाईची मोहीम सुरू केली. त्यामध्ये भंडाऱ्याची पोती असलेला एक टेम्पो सोमवारी सायंकाळी जप्त केला.अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अन्नसुरक्षा अधिकारी क्रांती बारवकर, रजिया शेख, लक्ष्मीकांत सावळे, डॉ संदीप शिंदे यांच्या पथकाने ही कारवाई केली. या कारवाईच्यावेळी जेजुरी पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे उपस्थित होते. पकडण्यात आलेल्या टेम्पोतील भंडाऱ्याचे नमुने पुढील तपासणीसाठी पाठवण्यात येणार असल्याची माहिती अन्नसुरक्षा अधिकारी क्रांती बारवकर यांनी दिली. नगरपरिषदेच्या निवडणुकीत विजयी झालेले उमेदवार रविवारी खंडोबा गडाच्या पायथ्याशी दर्शनासाठी आले होते. यावेळी औक्षण करताना मोठ्या प्रमाणात उधळलेल्या भंडाऱ्यामुळे आगीचा भडका उडाला. त्यामध्ये २ नगरसेविकांसह १६ जण जखमी झाले. यातील २ जणांना घरी सोडण्यात आले आहे. मात्र, १४ जणांवर उपचार सुरू आहेत. जखमींची प्रकृती सुधारत असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते माउली खोमणे यांनी दिली.जेजुरीत मोठ्या प्रमाणात भेसळयुक्त भंडारा येतो. हा भंडार भाविकांच्या आरोग्याला अपायकारक असून कालची दुर्घटना ही गंभीर आहे. येथे वर्षाकाठी खंडोबाच्या आठ मोठ्या यात्रा भरतात. लाखो लोक जेजुरीत येतात.

## कारवाईची मोहीम सुरू

घेऊन त्यांच्यावर व विक्रेत्यांवर तातडीने कारवाई व्हावी, अशी मागणी श्री मार्तंड देव संस्थानचे मुख्य विश्वस्त मंगेश घोणे यांनी केली आहे.जेजुरीत खंडोबा गडाच्या पायथ्याशी लागलेल्या भंडाऱ्याच्या आगीच्या दुर्घटनेत दोन नगरसेविकांसह १६ जण जखमी झाल्याच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर अन्न आणि औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी जेजुरीत भेसळयुक्त भंडारा विक्री करणाऱ्यांविरोधात कारवाईची मोहीम सुरू केली.

# पुणे पुस्तक महोत्सवात नवा उच्चांक

## पुणे पुस्तक महोत्सवाला साडेबारा लाख जणांची भेट

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**गेल्या नऊ दिवसांत झालेल्या पुणे पुस्तक महोत्सवात पुस्तक विक्रीचा नवा उच्चांक नोंदवला गेला आहे. यंदाच्या महोत्सवात ५० कोटी रुपयांहून अधिकची विक्री झाल्याचा अंदाज असून, महोत्सवाला १२ लाख ५० हजारांपेक्षा अधिक नागरिकांनी भेट दिली.**



राष्ट्रीय पुस्तक न्यासतर्फे १३ ते २१ डिसेंबर दरम्यान फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर पुणे पुस्तक महोत्सव झाला. महोत्सवातील उलाढालीसंदर्भातील माहिती मुख्य संयोजक राजेश पांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. महोत्सव संयोजन समितीचे सदस्य प्रसेनजित फडणवीस, बागेश्री मंठाळकर, प्रा. संजय चाकणे, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे कार्यवाह डॉ. आनंद काटीकर या वेळी उपस्थित होते.गेल्या वर्षीच्या महोत्सवात साडेसात लाख नागरिकांनी भेट दिली होती, तर सुमारे ४० कोटी रुपयांची विक्री झाली होती. त्यामुळे यंदाच्या महोत्सवाला नागरिकांनी दिलेली भेट, पुस्तक विक्रीचा उच्चांक नोंदवला गेला आहे.

पांडे म्हणाले, 'महोत्सवाच्या नऊ दिवसांमध्ये सुमारे १२.५ लाख नागरिकांनी भेट दिली. वेगवेगळ्या प्रकाशकांच्या पुस्तकांच्या ३० लाख प्रतींची विक्री झाली. त्यातून सुमारे ५० कोटी रुपयांपेक्षा अधिक उलाढाल झाली. प्रकाशकांकडून रकमेची नेमकी आकडेवारी उपलब्ध झाली नाही. मात्र, पुस्तकांच्या प्रतींच्या विक्रींबाबत माहिती संकलित करण्यात आली. ५०० पुस्तकांचे प्रकाशन महोत्सवात झाले. एक हजारांपेक्षा जास्त साहित्यिकांनी हजेरी लावली. पुणे शहर, पिंपरी-चिंचवड, जिल्ह्यासह राज्यभरातील, परदेशातूनही लोक महोत्सवासाठी आले होते. २०० पेक्षा जास्त ग्रंथालयांनी त्यांची पुस्तकखरेदी महोत्सवात केली.

-

महोत्सवातील पुणे लिट फेस्टच्या कार्यक्रमांनाही भरभरून प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमही गुणवत्तापूर्ण झाले. अक्षत गुप्ता यांच्यासारख्या लेखकांची पुस्तकावर स्वाक्षरी घेण्यासाठी रांगा लागल्या होत्या. त्यामुळे महोत्सवाला केवळ गर्दीच्या रूपात प्रतिसाद मिळतो असे नाही, तर जाणकार वाचक आवर्जून चर्चात्मक कार्यक्रमांना उपस्थित होते. महोत्सवाअंतर्गत सुमारे १ लाख तरुणांना पुस्तकखरेदीसाठी १०० रुपयांचे सवलत कूपन देण्यात आले, बंकिमचंद्र चटोपाध्याय यांच्या आनंदमठ कादंबरीच्या १ लाख प्रती मोफत वाटण्यात आल्या.

**मजूरांमध्ये असंतोष** मजुरांच्या रोजी रोटीचा प्रश्न

# डांगे चौकातील मजूर अड्डा स्थलांतराच्या हालचाली!

## हाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेले मजूरांना महापालिकेकडून स्थलांतरीत करण्याचा प्रयत्न

पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**सकाळचे सात वाजले की जेवणाचा डबा हातात घेऊन डांगे चौकात उभे राहणारे हात आता अस्वस्थ झाले आहेत. गेल्या कित्येक वर्षांपासून कामाच्या शोधात इथे उभे राहणाऱ्या मजुरांना बाजूला स्थलांतर करण्याच्या हालचाली सुरू झाल्याने त्यांच्या रोजीरोटीवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.**



महापालिकेकडून पर्यायी जागेची व्यवस्था होत असली तरी, इथून हलायचं नाही, अशी ठाम भूमिका मजुरांनी घेतली आहे.डांगे चौकातील उड्डाणपुलाच्या बाजूला पदपथाची व्यवस्था करून मजूर अड्डा तेथे स्थलांतरित करण्याचा प्रयत्न महापालिकेकडून सुरू आहे. मात्र, या निर्णयाला मजुरांचा तीव्र विरोध असून, हा प्रश्न त्यांच्या रोजीरोटीशी निगडित असल्याने असंतोष वाढत आहे. दररोज एक ते दीड हजार मजूर सकाळी कामाच्या शोधात हातात जेवणाचा डब्बा आणि कामाची अवजारे घेऊन याठिकाणी उभे राहतात. यामध्ये महिलांची संख्या लक्षणीय आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेले मजूर तसेच परप्रांतीय कामगार मोठ्या संख्येने येथे दररोज एकत्र येतात. पिंपरी-चिंचवड हे हाताला काम देणारे औद्योगिक शहर असल्याने रोजगाराच्या आशेने कामगारांचा ओघ सातत्याने वाढत आहे. बांधकाम क्षेत्रात निर्माण होणारी मजुरांची कमतरता भरून काढण्यासाठी हेच कामगार वेळेवर उपलब्ध होतात. अगदी नाममात्र मजुरीवर मिळेल ते काम करण्याची त्यांची तयारी असते, कारण त्यांच्यासाठी काम मिळणे हाच जगण्याचा एकमेव आधार आहे. सकाळी सात ते साडेअकरा या कालावधीत हे मजूर मोठ्या संख्येने येथे थांबतात. मात्र, आता अचानकपणे त्यांना येथून बाजूला पशुसंवर्धन विभागाच्या सीमेलगत पदपथावर स्थलांतर करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या रोजगाराच्या संधींवरच गदा येण्याची भीती व्यक्त केली जात आहे. कोणताही ठोस पर्याय न देता स्थलांतर करण्याचा प्रयत्न झाल्यास, या कष्टकरी मजुरांवर अन्याय होण्याची शक्यता आहे.

-डांगे चौकात मजूर अड्ड्यामुळे दररोज वाहतूक कोंडी होते.
- पीएमपीएमएल बसेसना अडथळा निर्माण होतो.
- पादचाऱ्यांना रस्ता ओलांडणे धोकादायक ठरत आहे.
- अपघाताचा धोका वाढला आहे.

> डांगे चौकातील वाहनांची वाढती संख्या लक्षात घेता उड्डाणपुलाखाली मजुरांचे थांबणे गैरसोयीचे आणि धोकादायक ठरत आहे. त्यामुळे मजुरांना अन्य सुरक्षित ठिकाणी थांबण्याची व्यवस्था करण्याचा विचार सुरू आहे. या संदर्भात कामगारांना विश्वासात घेऊनच योग्य तोडगा काढण्यात येणार आहे.
> **-बापू ढेरे,** पोलिस निरीक्षक (वाहतूक), वाकड

> मजुरांना उड्डाणपुलाच्या बाजूला सुरक्षितपणे उभे राहता यावे, या उद्देशाने डांगे चौकातून चिंचवडकडे जाणाऱ्या रस्त्यालगत अत्याधुनिक पद्धतीचा पदपथ तयार करण्यात येत आहे. याबाबत वाहतूक पोलिसांशी सविस्तर चर्चा झाली असून पदपथाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. पुढील काही दिवसांत हे काम पूर्ण करण्यात येईल.
> **-सुनील पवार,** कार्यकारी अभियंता, महापालिका.

# पिंपरी-चिंचवडमध्ये शिवसेनेलाही मोठे खिंडार!

## मिशन-PCMC : खासदार श्रीरंग बारणे यांचा उजवा हात राजेश आरसूळ 2 हजार कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये!

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**'पिंपरी- चिंचवड : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची निवडणूक पार पडत असताना पिंपरी चिंचवड शहरात मोठमोठ्या राजकीय उलथापालथींना सुरुवात झाली आहे. गेली काही दिवस राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला धक्के बसत असताना आता शिवसेनेला देखील मोठे खिंडार पडले आहे. शिवसेना पक्षाचे पिंपरी चिंचवड उपशहर प्रमुख राजेश आरसूळ यांनी आपल्या दोन हजार कार्यकर्त्यांसह शिवसेनेला जय महाराष्ट्र करत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये प्रवेश केला आहे..**




गेली काही दिवस पिंपरी-चिंचवड शहराच्या राजकारणात भारतीय जनता पार्टीने सातत्याने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीवर आघात करण्यास सुरुवात केली आहे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अनेक नगरसेवक भारतीय जनता पार्टीमध्ये जात असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या दृष्टीने चिंतेची बाब निर्माण झालेली होती पिंपरी चिंचवड शहर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हातातून निसटते की काय अशी अवस्था निर्माण झाली होती.

परंतु, आता अजित पवार यांनीही भाजपावर पडतवार करण्यास सुरुवात केली असून शिवसेना शिंदे गटालाही त्यांनी सोडले नाही. आज शिवसेना शहर उपप्रमुख राजेश आरसूळ व त्यांच्या पत्नी सौ मनीषा राजेश आरसूळ यांनी अजित पवार यांचे उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये प्रवेश केला आहे यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे निवडणूक प्रमुख नाना काटे नगरसेवक भाऊसाहेब भोईर आदी प्रमुख ही उपस्थित होते. पुण्यात झालेल्या या पक्षप्रवेशावेळी राजेश अडसूळ यांचे जवळपास 2000 कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा झेंडा हाती घेतला आहे.

राजेश आरसूळ व सौ मनीषा राजेश आरसूळ यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षप्रवेशामुळे वाल्हेकर वाडी, चिंचवडे नगर प्रभाग क्रमांक 17 मधील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पॅनल मजबूत झाले असून या प्रभागातील भाजपच्या दिग्गजांना मोठा धक्का बसणार असे चित्र निर्माण झाले आहे.


या प्रवेशावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सौ मनीषा राजेश आरसुळ यांना शुभेच्छा देत त्यांच्यासारख्या युवा व अभ्यासू उमेदवारामुळे पिंपरी चिंचवड शहराच्या विकासाला मौलिक हातभार लागेल असे मत व्यक्त केले. सौ. मनीषा राजेश अडसूळ यांनी यावेळी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले की उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासारख्या शहराचा दैदिप्यमान विकास करणाऱ्या नेतृत्वास सोबत काम करण्याची संधी मिळाली हे माझ्यासारख्या तरुण महिला कार्यकर्त्याला अभिमानाची बाब आहे. नगरसेवक भाऊसाहेब भोईर व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पिंपरी चिंचवड शहर निवडणूक प्रमुख नाना काटे यांनी माझ्यावर विश्वास दाखवून मला संधी उपलब्ध करून दिली त्याबद्दल मी त्यांचे धन्यवाद व्यक्त करते असेही सौ मनीषा राजेश आरसूळ यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

# गणित केवळ तर्कशुद्ध गणना नव्हे




**गणित म्हणजे नक्की काय? संख्या म्हणजे काय? आणि अनुभवाशिवाय गणित कसे उभे राहते? हे प्रश्न प्रथमदर्शनी कठीण वाटतात, पण थोडा विचार केला तर ते प्रश्न कठीण नसतात हे आपल्या लक्षात येईल. गणित म्हणजे केवळ आकड्यांच्या बेरीज-वजाबाकीचे शास्त्र नाही; तर ते त्याहून खूप व्यापक आहे.**

आपण म्हणतो ते ‘तीन’, ‘दहा’, ‘शंभर’ हे आकडे स्वतः वस्तू नसतात. ‘तीन’ हा आकडा दिसत नाही; दिसतात त्या तीन वस्तू. उदा. तीन सफरचंद, सात दगड आपण त्या वस्तूंच्या मोजणीतून ‘तीन’ म्हणजे किती, ‘सात’ म्हणजे किती, ही कल्पना तयार करतो. म्हणजे संख्या ही प्रत्यक्ष जगात दिसणारी वस्तू नाही, पण मनाने बनवलेली एक समजूत, एक अमूर्त कल्पना आहे. गणित अशाच अनेक अमूर्त कल्पनांचा वापर करून उभे राहते. गणिताविषयी विचार करताना सर्वप्रथम समोर येतो तो त्याच्या स्वरूपाचा प्रश्न. गणित हे केवळ संख्यांविषयीचे शास्त्र आहे अशी सोपी व्याख्या अपुरी ठरते, कारण संख्या हा गणिताचा एक भाग असून संपूर्ण गणिताची व्याप्ती त्यापेक्षा फार मोठी आहे. संख्या स्वतः इंद्रियगोचर वस्तू नसतात; आपल्याला त्यांचे प्रत्यक्ष संवेदन होत नाही. म्हणून गणित हे मूलत: अशा अमूर्त संकल्पनांचे, त्यांच्यातील संबंधांचे आणि त्या संबंधांतील सुसंगततेचे शास्त्र आहे असे म्हणावे




लागते. या अमूर्तपणामुळेच गणित अनुभवावर अवलंबून नसते, तर ते ‘निगमी’ म्हणजेच न्यायनिष्ठ, कडक तर्काच्या आधारावर उभे राहते.गणितातील निगमनपद्धतीची सुरुवात मूलविधाने म्हणजे गृहीतके (AXIOMS) यांच्यापासून होते. ही मूलविधाने आपण थेट इंद्रियानुभवावर आधारून घेत नाही. ती आपण ‘मान्य’ करतो, कारण त्यांत विरोधाभास नाही, त्यांच्यापासून निघणारी तर्कसंगत बांधणी शक्य आहे आणि ती संपूर्ण प्रणाली एकसंध ठेवतात. याचा अर्थ ती ‘प्रमाण’ आहेत म्हणून स्वीकारलेली नसतात, तर ती गृहितके असून त्यांचा योग्य तर्काने विस्तार करता येतो हेच त्यांचे प्रामाण्य. मूलविधानांचे प्रामाण्य समजण्याचा निकष म्हणजे अंतर्गत सुसंगती, विरोधाभासाचा अभाव आणि तर्कशुद्ध सुसंगती असतात.मूलविधानांपासून एखादा सिद्धान्त ‘अनिवार्यपणे’ निष्पन्न होतो का हे आपल्याला शुद्ध तर्कविचाराने कळते; अनुभवापेक्षा विचारशक्ती इथे निर्णायक ठरते. म्हणजे गणिताची पद्धत अनुभवावर आधारित नसते. गणितातील सिद्धान्त हे ‘मी पाहिले त्यामुळे खरे’ असे नसून ‘मी तर्काने सिद्ध केले त्यामुळे खरे’ असे असते. यासाठी गणित काही मूलविधाने (AXIOMS) ठरवते. ही मूलविधाने जगात खरी आहेत म्हणून आपण घेतो की त्यावर सुसंगत गणित बांधता येते म्हणून घेतो? उदा. ‘सपाट पृष्ठभागावर दोन सरळ रेषा एकमेकांना एकाच बिंदूत छेदतात’, हे मूलविधान आपण शाळेत शिकतो. आपण ते गृहित धरतो आणि त्यातून तर्क लावून पुढची संपूर्ण भूमिती उभी करतो. हे मूलविधान शाब्दिक अर्थाने ‘सिद्ध’ नसते; तर ती विश्वाची एक ‘तर्कशुद्ध मांडणी’ आहे. तिच्यावर उभारलेल्या पद्धतीमध्ये विरोधाभास निर्माण होत नाही. हा विरोधाभास नसणे आणि सुसंगती टिकणे हेच ते मूलविधान ‘बरोबर’ असल्याचे निकष आहेत.तर मग प्रश्न असा उरतो की अप्लॅटोने गणितीय सत्यांना अनुभवापलीकडील जगातील शाश्वत सत्ये म्हटले; कांटने गणिताला मानवी ज्ञानेच्छेची पूर्वअट (A PRIORI FORM OF INTUITION) मानले; तर आधुनिक तत्त्वज्ञान गणिताला भाषा आणि तर्क यांच्या संरचनेतून निर्माण होणारी सुसंगत व्यवस्था म्हणते. या सर्वांचा सामायिक आधार असा की गणितातील क्षमता ही माणसाच्या चिंतनशक्तीत म्हणजे अमूर्त तर्कशक्तीमध्येच निवास करते. ही शक्ती फक्त गणितापुरती मर्यादित नाही; ती भाषा, सौंदर्यनिर्णय, विज्ञानातील प्रारूपे, कायद्यातील तर्कबद्धता, दैनंदिन निर्णयपद्धती यांमध्येही दिसून येते. म्हणून गणित ही मनाची फक्त एक विशेष क्षमताच नव्हे, तर मनाच्या एकूण तर्कक्षमतेचे सर्वाधिक शुद्ध आणि स्वच्छ रूप आहे.शा अमूर्त, विचाराधिष्ठित गोष्टी माणूस समजू कसा लागला? त्यासाठी एक विशिष्ट मानसिक क्षमता असावी लागते. ज्या प्रकारे आपण भाषेमध्ये व्याकरणाचे नियम धरतो आणि वाक्ये तयार करतो, त्याचप्रमाणे गणितामध्ये मन अमूर्त नियम धरते आणि त्यावर आधारित तर्कबद्ध बांधणी करते. ही क्षमता केवळ गणितापुरती मर्यादित नाही.

## संपादकीय »

### साठमारी!

***महाराष्ट्रातील महापालिकांच्या निवडणुका नक्की कोणत्या मुद्द्यावर लढल्या जाणार, या प्रश्नाचे उत्तर देण्याचा बौद्धिक प्रामाणिकपणा एकाही पक्षाकडे आज उरलेला नाही...***

प्रदीर्घ काळ विवाहाच्या प्रतीक्षेत राहावयाची वेळ आलेला बोहोल्यावर चढण्यास जेवढा उतावीळ असतो त्यापेक्षाही अधिक हुरहुर राज्यातील उद्याच्या ‘विकासगामी’ राजकीय नेत्यांच्या मनात होती. महानगरपालिकांच्या निवडणुका जाहीर झाल्याने तीस एकदाचे तोंड फुटेल. राज्यभरातील तब्बल २९ महापालिकांतून आता विकासगंगा वाहू लागतील आणि तीत हात धुऊन घेण्यासाठी राज्यातील हे विकासेच्छुक वाट्यालोटे घेऊन राजकीय पक्षांचे उंबरठे झिजवू लागतील. अभिमानाने फुलून यायला हवेत. तसे होताना दिसत नाही. याचे कारण आचारी खूप वाढले की ज्याप्रमाणे खाद्यापदार्थाची माती होते त्याप्रमाणे विकासेच्छूंची संख्या वाढली की प्रत्यक्ष विकास मागे पडतो आणि या विकासेच्छूंचाच विकास अधिक होतो या वास्तवाची जाणीव मराठीजनांस गेल्या काही वर्षांत झाली असणार.

**एकविसाव्या शतकात ‘शाश्वत विकास’ ही परवलीची संज्ञा झाली आहे. संयुक्त राष्ट्र संघाने २०१५ मध्ये जगातील सर्व देशांसाठी १७ शाश्वत विकास उद्दिष्टे (SUSTAINABLE DEVELOPMENT GOALS) निर्धारित केली आहेत जी २०३० पर्यंत सर्व देशांना गाठायची आहेत. ही सर्व उद्दिष्टे अत्यंत सर्वसमावेशक आहेत.**

# स्वास्थ्याशिवाय समाजाचा विकास अशक्यच!

गरिबी, भूक यापासून मुक्तता, आरोग्य आणि खुशाली, गुणवत्तापूर्ण शिक्षण, सर्वप्रकारच्या विषमतेचे उच्चाटन, शाश्वत आणि शुद्ध ऊर्जा, पाणी आणि जमिनीवरील जीवनमान, इ. आपण आणि जभरातील सर्व देश जर असा शाश्वत विकास साधू शकलो तर खरोखर सर्व प्राणिमात्रांचे सुख आणि समाधान साध्य करता येईल. यासाठी मानसशास्त्राचे नेमके काय योगदान आसावे जेणेकरून देशातील लोकांचे मानसिक आरोग्य चांगले आणि शाश्वत राहील हे पाहणे महत्वाचे आहे.या अनुषंगाने भारतातील मानसिक आरोग्य स्थितीचा वस्तुनिष्ठ आढावा घेतल्यास आपण नेमके कुठे आहोत, संशोधनाची दिशा काय असावी, कोणत्या प्रकारची धोरणे राबवावी लागतील, यासाठी कुठल्या पायाभूत सुविधा निर्माण कराव्या लागतील, शैक्षणिक संस्थांचा आणि समुदायाचा सहभाग कसा असावा या बाबी स्पष्ट होतील.भारताच्या लोकसंख्येचा विचार केल्यास जगाच्या



लोकसंख्येच्या १८ टक्के लोकसंख्या भारतात राहते. लोकसंख्याशास्त्राच्या दृष्टीने पाहिल्यास भारत हा तरुणांचा देश आहे असे म्हटले जाते. म्हणजे उत्पादन करू शकणाऱ्या लोकांची संख्या ही सर्वाधिक आहे. पण याची दुसरी काळी बाजू म्हणजे केवळ मानसिक आरोग्याच्या समस्येमुळे २०१२ ते २०३० या कालावधीत १.३ ट्रिलियन डॉलर्स (म्हणजे एक लाख तीस हजार कोटी डॉलर्स) इतके प्रचंड आर्थिक नुकसान देशाचे होत आहे, होणार आहे. निमहांस (NIMHANS) या बंगलोरस्थित संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात देशातील १०.६ टक्के वयस्क कुठल्या ना कुठल्या मानसिक आजाराने त्रस्त आहेत. यात शहरी लोकांचे प्रमाण ग्रामीण भागांतील लोकांपेक्षा जास्त आहे. १३.७ टक्के लोकांना आयुष्यात कुठल्यातरी टप्प्यावर मानसिक विकार जडतो. मनोविकार झालेल्यांपैकी ७० ते ९२ टक्के लोकांना कधी उपचारच मिळत नाहीत. जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) निकषाप्रमाणे एक लाख लोकसंख्येसाठी तीन मानोविकार तज्ज्ञांची आवश्यकता असताना आपल्याकडे केवळ ०.७५ मनोविकार तज्ज्ञ आहेत.देशात पहिल्यांदा १९८२ मध्ये राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमाची सुरुवात झाली. तज्ज्ञ मनुष्यबळाची कमतरता भरून काढण्यासाठी मानसिक आरोग्याला सर्वसाधारण आरोग्य आस्थापनाशी जोडून सर्वसामान्यांना सुलभ उपचार कसे मिळतील हे पाहण्यात आले. त्यानंतर १९८४ मध्ये राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम (बेल्लारी मॉडेलवर आधारित) सुरू करण्यात आला.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## शिंदेंची शिवसेनाही जोमात — अनिकेतराजे नाईक-निंबाळकर यांचा पराभव

# पश्चिम महाराष्ट्रात भाजपचा वरचष्मा

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

## महाविकास आघाडी बॅकफूटवर



**पश्चिम महाराष्ट्रात नगरपालिका निवडणुकीत भाजपा व शिवसेना शिंदे गटाची सरशी झाली असून, महाविकास आघाडी बॅकफूटवर गेली आहे. लक्षवेधी लढतीत फलटणमध्ये विधान परिषदेचे माजी सभापती रामराजे नाईक निंबाळकर यांचे पुत्र अनिकेतराजे नाईक-निंबाळकर यांचा धक्कादायक पराभव झाला, तर पंढरपूरमध्ये भगिरथ भालके यांच्या पत्नी डॉ. प्रणिता भालके यांनी माजी आमदार प्रशांत परिचारक गटाचे आव्हान मोडीत काढत नगराध्यक्षपदाच्या मुकुटावर नाव कोरले. या निकालाने भाजपाने आपली मांड पक्की केल्याचे अधोरेखीत झाले आहे.**

पश्चिम महाराष्ट्रातील साखर पट्ट्यात नगरपालिकांवर वर्चस्वासाठी भाजपा व शिवसेना शिंदे गटाने सर्व शक्ती पणाला लावली होती. विधानसभा निवडणुकीतील घवघवीत यशानंतर नगरपालिका निवडणुकीत भाजपा व शिंदे गटाचा विजयी वारु कायम राहिला. महायुतीतील राष्ट्रवादी अजित पवार गटाला जेमतेम यश मिळाले. काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट व शिवसेना ठाकरे गटाची मोठी पिछेहाट झाली. सातारा जिल्ह्यात भाजपा नंबर वन ठरला. दहापैकी सात पालिकांवर भाजपने सत्ता प्रस्थापित केली. सातारा येथे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले व खासदार उदयनराजे भोसले यांचाच बोलबाला राहिला. कोल्हापूर जिल्ह्यात शिवसेना शिंदे गट भाजपाला वरचढ ठरला. शिंदे गटाने मुरगुड, हातकणंगलेत झेंडा फडकाविला. कुरुंदवाड, जयसिंगपूरमध्ये माजी मंत्री राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी सत्ता कायम राखली. कागलमध्ये वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी समरजित घाटगे यांच्या साथीने आपला गड राखला. मुरगुडमध्ये माजी खासदार संजय मंडलिक यानी मुश्रीफ-घाटगे गटाला धोबीपछाड दिला. चंदगडमध्ये दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येऊनही भाजपने बाजी मारली. गडहिंग्लजमध्ये मुश्रीफ गटाने भाजपा, शिवसेना शिंदे गट, जनता दलावर मात केली. माजी मंत्री विनय कोरे यांच्या जनसुराज्य पक्षाने पन्हाळा व मलकापूर नगरपालिकेवर वर्चस्व राखले.सांगली जिल्ह्यात

## जयंत पाटील भारी ठरले

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचे होमग्राउंड असलेल्या कराडमध्ये भाजपाचे कमळ कोमेजले. येथे माजी सहकार मंत्री बाळासाहेब पाटील व शिवसेना शिंदे गटाने भाजपाला अस्मान दाखविले. नगराध्यक्षपदाच्या लढतीत शिंदे गटाचे राजेंद्रसिंह यादव यांनी भाजपाच्या विनायक पावस्कर यांचा पराभव केला. फलटणमध्ये रामराजे नाईक निंबाळकर यांच्या सत्तेला सुरुंग लागला.

ईश्वरपूर व आष्ट्यात माजी मंत्री जयंत पाटील भाजपाला भारी ठरले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उच्च तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी प्रतिष्ठा पणाला लावूनही जयंत पाटील यांनी दोन्ही ठिकाणी आपला मुत्सद्दीपणा सिद्ध केला. विट्यात शिंदे गटाचे आमदार सुहास बाबर यांनी माजी आमदार सदाशिवराव पाटील यांच्या ताब्यातील सत्ता खेचून आणली. भाजपामध्ये प्रवेश केलेल्या पाटील गटाला मोठा झटका बसला. शिराळ्यातही शिंदे गटाच्या पृथ्वीराज नाईक यांनी नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत गुलाल उधळला.

तासगावमध्ये माजी खासदार संजय पाटील (काका) यांच्या गटाने आमदार रोहित पाटील गटाचा पराभव केला. पलूसमध्ये माजी मंत्री विश्वजित कदम यांनी भाजपाचे आव्हान परतावून लावले. या निवडणुकीत महायुतीतील भाजपा व शिवसेना शिंदे गटात वर्चस्वासाठी रस्सीखेच राहिली. कोल्हापूर जिल्ह्यात शिवसेना शिंदे गटाने भाजपाला मागे टाकले.सोलापूर जिल्ह्यात अकलूजमध्ये मोहिते पाटील गटाने भाजपाला रोखले. खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांची यांची खेळी निष्प्रभ केली. पंढरपूरमध्ये भगिरथ भालके यांनी विधानसभा निवडणुकीतील पराभवाची कसर भरून काढत पत्नी प्रणिता भालके यांना निवडून आणले. आवताडे व माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या गटाला पराभवाला सामोरे जावे लागले.

# घोटाळ्यात पवारांचा सहभाग!

## उपमुख्यमंत्र्यांचे तीन ओएसडी सहभागी तरीही माहित कसे नाही ?

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुण्यातील पार्थ पवार यांच्या जमीन घोटाळ्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे तीन ओएसडी पार्थ यांना मदत करीत होते त्यामुळे या अजित पवार यांचा थेट संबंध असल्याचा खळबळजनक आरोप करीत सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी गृहमंत्रीव फडणवीस त्यांनीही लक्ष केले.**

पुण्यातील माहिती अधिकार कार्यकर्ते आणि अंजली दमानिया यांनी आज सकाळी पत्रकार परिषद घेऊन पुण्यातील जमीन घोटाळा प्रकरणात सरकारी यंत्रणा कशी पार्थ पवार यांच्या दिमतीला होती याचे पुरावे दाखवले. अजित पवार म्हणतात म्हाला या प्रकरणाची माहिती नाही मात्र त्यांचे विशेष कार्य अधिकारी राम चौबे,ढाकणे आणि आणखी एक असे तीन लोक या घोटाळ्यात पार्थ पॉवर याना मदत करीत होते, ‘उपमुख्यमंत्री कार्यलयात अधिकारी जेव्हा मदत करीत होते तेव्हा अजित पवार यांचा संबंध नाही असे म्हणणे हास्यास्पद असल्याचे दमानिया यांनी म्हटले आहे. जमिनीचा व्हाव्हर थेट शीतल तेजवानी आणि पार्थ पवार यांच्यात झाला हे सिद्ध होत असताना आरोपपत्रात अजूनही पार्थ पवार यांचे नाव का येत नाही असा



सवाल करीत दमानिया म्हणाल्या की पार्थ पवार याना गृहमंत्री देवेंद्र फडणवीस वाचवत आहेत. मुद्रांक जिल्हाधिकारी सुद्धा पार्थ पवार याना कशी मदत करीत होते याचेही काही पुरावे दमानिया यांनी आज माध्यमांना दाखवले. अजित पवार यांचे ओएसडी या प्रकरणाची संपूर्ण माहिती शीतल तेजवानी आणि पार्थ पवारांना देत होते याचा व्हाट्स अप डेटा दमानिया यांनी आज सादर केला. ही माहिती ऍड. तृप्ता ठाकूर यांनी आपल्याला दिल्याचे यावेळी

## उद्यापासून पुण्यात आंदोलन

घोटाळा प्रकरणात सरकारी यंत्रणा कशी पार्थ पवार यांच्या दिमतीला होती याचे पुरावे दाखवले. अजित पवार म्हणतात म्हाला या प्रकरणाची माहिती नाही मात्र त्यांचे विशेष कार्य अधिकारी राम चौबे,ढाकणे आणि आणखी एक असे तीन लोक या घोटाळ्यात पार्थ पॉवर याना मदत करीत होते.

दमानिया म्हणाल्या. आरोपपत्रात पार्थ पवार यांचे नाव दाखल करावे आणि या प्रकरणात अजित पवार यांचा थेट संबंध असल्याने त्यांचा फडणवीस यांनी तात्काळ राजीनामा घ्यावा अशीही मागणी यावेळी अंजली दमानिया यांनी केली आहे.

जमीन घोटाळ्यात पार्थ पवार यनाचे नाव न आल्यास आम्ही उद्यापासून पुण्यात जाऊन पोलीस ठाण्याच्या पुढे आंदोलन करणार असल्याची माहिती यावेळी अंजली दमानिया यांनी दिली आहेउपमुख्यमंत्री अजित पवार यांचे तीन ओएसडी पार्थ यांना मदत करीत होते त्यामुळे या अजित पवार यांचा थेट संबंध असल्याचा खळबळजनक आरोप करीत सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी गृहमंत्रीव फडणवीस त्यांनीही लक्ष केले.

## तपास यंत्रणांचा दुरुपयोग

## जर्मनीतल्या भाषणात काय म्हणाले राहुल गांधी?

# भाजपाकडून लोकशाहीवर हल्ला

## हरियाणात आम्ही जिंकणार होतो

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे सध्या जर्मनीच्या दौऱ्यावर आहे. जर्मनीतल्या बर्लिन या ठिकाणी त्यांनी भाषण केलं आणि मुलाखतही दिली. राहुल गांधींनी यावेळी भाजपावर जोरदार टीका केली.**



भारतात लोकशाहीवर हल्ला होतो आहे. हरियाणा या राज्यात आम्ही जिंकणार होतो. पण निवडणूक व्यवस्थेत समस्या निर्माण करण्यात आली आणि आमचा पराभव झाला. राहुल गांधींच्या भाषणाचा हा व्हिडीओ काँग्रेसने पोस्ट केला आहे.राहुल गांधी पुढे म्हणाले, “तेलंगणा, हिमाचल प्रदेश या ठिकाणी आम्ही जिंकलो. निवडणूक प्रक्रियेत आम्ही पारदर्शकतेचा मुद्दा सातत्याने उपस्थित करत आहोत. पण हरियाणा आणि महाराष्ट्र या दोन्ही ठिकाणी निवडणूक पारदर्शक पद्धतीने घेण्यात आली नाही. भारतातील मोठ्या सार्वजनिक संस्थांवरचा हा हल्ला आहे. मी घेतलेली पत्रकार परिषद तुम्ही पाहिली असेलच. ब्राझीलच्या महिलेने हरियाणात मतदान केलंय. हरियाणाच्या मतदार यादीत तिचं नाव २२ वेळा आहे. एका महिलेने एका बूथवर २०० वेळा मतदान केलं. याबाबत आम्ही प्रश्न उपस्थित केले की निवडणूक आयोग उत्तर देत नाही. निवडणूक आयोगाच्या पायाभूत व्यवस्थेत बिघाड करण्यात आला आहे हे आमचं प्रामाणिक मत आहे.”राहुल गांधी पुढे म्हणाले, आमच्या देशातल्या सार्वजनिक संस्थांवर सातत्याने हल्ला होतो आहे. आमचा गुप्तचर विभाग, सीबीआय, ईडी यांचा वापर विरोधकांच्या विरोधात हत्यारांप्रमाणे केला जातो आहे. सीबीआय आणि ईडी यांच्याकडून करण्यात आलेल्या केसेस या भाजपाला विरोध करणाऱ्यांवरच आहे. भारतात तुम्ही जर बडे व्यावसायिक असाल आणि तुम्ही काँग्रेसला पाठिंबा दिला तर तुम्हाला धमक्या दिल्या जातात की तपास यंत्रणा तुमच्या घरी आणि कार्यालयांवर धाडी टाकतील. भारतात सार्वजनिक संस्था आपलं काम त्यांच्या मनाने नाही तर सरकारच्या सांगण्याप्रमाणे करतात. काँग्रेसने कधीही तपासयंत्रणांचा दुरुपयोग केला नाही. मात्र भाजपाकडून या संस्थांचा उपयोग राजकीय ताकद वाढवण्यासाठी होतो आहे.

### काय म्हणाले राहुल गांधी?

आम्ही प्रश्न उपस्थित केले की निवडणूक आयोग उत्तर देत नाही. निवडणूक आयोगाच्या पायाभूत व्यवस्थेत बिघाड करण्यात आला आहे हे आमचं प्रामाणिक मत आहे.”राहुल गांधी पुढे म्हणाले, आमच्या देशातल्या सार्वजनिक संस्थांवर सातत्याने हल्ला होतो आहे. आमचा गुप्तचर विभाग, सीबीआय, ईडी यांचा वापर विरोधकांच्या विरोधात हत्यारांप्रमाणे केला जातो आहे.

लोकशाहीचा पायाच खिळखिळा केला जातो आहे. आम्ही सातत्याने याचा सामना करत आहोत. आम्ही अशी व्यवस्था तयार करत आहोत की भाजपाला या संस्थांचा उपयोग स्वतःच्या फायद्यासाठी करु देणार नाही असंही राहुल गांधींनी बर्लिनमध्ये म्हटलं आहे. आता यावरुन भाजपाकडून काय काय प्रतिक्रिया येणार हे पाहणं महत्त्वाचं असेल.काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे सध्या जर्मनीच्या दौऱ्यावर आहे. जर्मनीतल्या बर्लिन या ठिकाणी त्यांनी भाषण केलं आणि मुलाखतही दिली. राहुल गांधींनी यावेळी भाजपावर जोरदार टीका केली. भारतात लोकशाहीवर हल्ला होतो आहे. हरियाणा या राज्यात आम्ही जिंकणार होतो. पण निवडणूक व्यवस्थेत समस्या निर्माण करण्यात आली आणि आमचा पराभव झाला. राहुल गांधींच्या भाषणाचा हा व्हिडीओ काँग्रेसने पोस्ट केला आहे.राहुल गांधी पुढे म्हणाले, “तेलंगणा, हिमाचल प्रदेश या ठिकाणी आम्ही जिंकलो. निवडणूक प्रक्रियेत आम्ही पारदर्शकतेचा मुद्दा सातत्याने उपस्थित करत आहोत. पण हरियाणा आणि महाराष्ट्र या दोन्ही ठिकाणी निवडणूक पारदर्शक पद्धतीने घेण्यात आली नाही. भारतातील मोठ्या सार्वजनिक संस्थांवरचा हा हल्ला आहे. मी घेतलेली पत्रकार परिषद तुम्ही पाहिली असेलच. ब्राझीलच्या महिलेने हरियाणात मतदान केलंय. हरियाणाच्या मतदार यादीत तिचं नाव २२ वेळा आहे.

# नक्षलवादी हल्ल्यात काँग्रेसचा हात!

## जे. पी. नड्डा यांनी सोमवारी काँग्रेसवर खळबळजनक आरोप केला

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भाजपाचे अध्यक्ष आणि केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांनी सोमवारी काँग्रेसवर खळबळजनक आरोप केला आहे. २०१३ मध्ये नक्षलवाद्यांनी केलेल्या झिरम घाटी येथील हल्ल्यात “काँग्रेसचेच काही लोक सहभागी होते”, असा आरोप नड्डा यांनी केला आहे.**

बस्तर भागात झालेल्या या हल्ल्यात २०१४ विधानसभा निवडणुकीसाठी प्रचार करत असताना वरिष्ठ काँग्रेस नेत्यांची हत्या झाली होती. दरम्यान नड्डा यांनी केलेल्या या दाव्याची सध्या चांगलीच चर्चा होत आहे. छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णू देव साय यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारला दोन वर्ष पूर्ण झाल्याबद्दल जांजगीर-चांपा जिल्ह्यात आयोजित ‘जनादेश परब’ या कार्यक्रमात बोलताना नड्डा यांनी हा दावा केला आहे. छत्तीसगड भाजपाचे प्रभारी म्हणून नड्डा यांनी काम केले होते. तेव्हा घडलेल्या घटनेबद्दल बोलताना नड्डा म्हणाले की, “... मी झिरम घाटीची घटना पाहिली आहे. मी पूर्ण जबाबदारीने सांगू इच्छितो की... झिरम घाटी घटनेची सविस्तर आणि आतली माहिती दुसऱ्या कोणीही नाही, तर त्यांच्यातील (काँग्रेस) अशा लोकांनी दिली ज्यांना आपल्याच लोकांचा हत्या करायची होती आणि जे नक्षलवाद्यांच्या संपर्कात होते. जर रक्षण करणारा स्वत:च अत्याचार करणारा बनला, तर छत्तीसगडच्या सामान्य लोकांचे काय होईल.”मात्र जे. पी. नड्डा यांनी कथित कटाबद्दल अधिकची माहिती दिली नाही, तसेच त्यांनी यावेळी कोणाचे नावही घेतले नाही.पुढे नड्डा यांनी राज्यात भाजपा सरकारने सुरू केलेल्या विकास कामांवर भाष्य केले. नड्डा यांनी राज्यातील नक्षलवाद जवळपास संपवत आणल्याचे श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना दिले. तसेच अमित शाह यांनी मार्च २०२६ पर्यंत देशातून नक्षलवाद पूर्णपणे संपवण्याची डेडलाईन निश्चित केली आहे असेही त्यांनी यावेळी सांगितले.गेल्या दोन वर्षात छत्तीसगडमधे ५०३ जणांचा मृत्यू झाला आहे. तर या वर्षी २८४ माओवाद्यांना ठार करण्यात आले आहे, ज्यापैकी २५५ हे बस्तर भागातील आहेत. गेल्या वर्षी २१९ माओवाद्यांना ठार करण्यात आले होते, ज्यामध्ये २१७ हे बस्तर भागातील होते.नड्डा यांनी सांगितले की, “गेल्या दोन वर्षांत जवळपास २५०० नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे, १८५३ जणांना अटक करण्यात आली



### २०१३ मध्ये काय झाले होते?

२५ मे २०१३ मध्ये बस्तर जिल्ह्यातील काँग्रेसच्या परिवर्तन रॅलीवेळी काँग्रेस नेत्यांच्या ताफ्यावर माओवाद्यांनी हल्ला केला होता, ज्यामध्ये ३२ जणांचा मृत्यू झाला होता. मृतांमध्ये काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नंद कुमार पटेल, माजी विरोधीपक्ष नेते महेंद्र कर्मा, आणि माजी केंद्रीय मंत्री विद्याचरण शुक्ला यांचा समावेश होता.

# तो' अपमान अन् अचानक TV इंडस्ट्री सोडली!

'झी मराठी' वाहिनीवरील 'पारू' मालिकेला सध्या प्रेक्षकांचा चांगलाच प्रतिसाद मिळताना दिसत आहे. लोकप्रियतेच्या शिखरावर असलेल्या या मालिकेत नुकतीच दिशा म्हणजेच अभिनेत्री पूर्वा शिंदेची जबरदस्त एन्ट्री पाहायला मिळाली. ५ आलिशान गाड्या, ११ बॉडीगार्ड्स आणि वेस्टर्न लूकमध्ये दिशाची एन्ट्री झाली. यामुळे किर्लोस्कर कुटुंबासह पारूला धक्काच बसला. तीन महिन्यांनंतर जेलमधून आलेली दिशा आता किर्लोस्कर कुटुंबाचा सर्वनाश करण्यासाठी प्रयत्न करताना दिसत आहे. तिने स्वतःची नवी कंपनी सुरू केली आहे. त्यामुळेच सध्या दिशा म्हणजे पूर्वा शिंदे चर्चेत आली आहे.अलीकडेच अभिनेत्री पूर्वा शिंदेने 'अल्ट्रा मराठी बझ' या युट्यूब चॅनेलशी संवाद साधला. यावेळी तिने मालिकेतील कलाकारांबरोबर असलेल्या बॉन्डबद्दल सांगितलं. तसंच पूर्वा मालिकेतील एका अभिनेत्रीला चिडका बिब्बा म्हणाली.पूर्वा शिंदे



म्हणाली, "माझं सगळ्यांशी खूप छान बॉन्ड आहे. सध्या माझ्या जवळची व्यक्ती आहे चिंटू म्हणजे संजना काळे. आम्ही कुठल्याही कार्यक्रमासाठी गेलो, तर तिथे आम्ही एकाच रुममध्ये राहतो. ती मला भरवते सुद्धा. म्हणजे तिला माहितीये, घरी माझे आई-बाबा त्यांच्या हाताने जेवण भरवतात. हे तिच्या नेहमी लक्षात असतं. त्यामुळे मी आवरत असेल, टाइमपास करत असेल तर ती मला पटापट घास भरवणार. इतकी माझी काळजी घेते. तिच्यासारखीच पारू आहे. रोज पॅकअप झाल्यावर कितीही तिला उशीर होऊ दे, ती दारातून हाक मारते पूर्वा, पूर्वा. फक्त हाय करण्यासाठी ती हे करते.

## तुझेच मी गीत गात आहे

स्टार प्रवाह' वाहिनीवरील लोकप्रिय मालिकांपैकी एक म्हणजे 'तुझेच मी गीत गात आहे'. अभिनेता अभिजीत खांडकेकर, उर्मिला काठोरे, प्रिया मराठे, तेजस्विनी लोणारी, अवनी तायवाडे, अवनी जोशी, दीप्ती जोशी, पल्लवी वैद्य असे अनेक तगडे कलाकार मंडळी असलेली 'तुझेच मी गात आहे' मालिका खूप गाजली. टीआरपीच्या शर्यतीतही मालिका अव्वल स्थानावर होती. पण, गेल्या वर्षी १६ जूनला 'तुझेच मी गीत गात आहे' मालिकेचा शेवट झाला. ज्या क्षणाची प्रेक्षक दोन वर्ष आतुरतेने वाट पाहत होते, त्या क्षणाने या मालिकेचा शेवट झाला. मल्हारला स्वरा त्याची खरी लेक असल्याचं दाखवत 'तुझेच मी गीत गात आहे' मालिकेने प्रेक्षकांचा निरोप घेतला. पण, 'तुझेच मी गीत गात आहे' मालिकेतील मल्हार म्हणजे अभिनेता अभिजीत खांडकेकर सध्या काय करतो? जाणून घ्या... 'तुझेच मी गीत गात आहे' मालिकेने निरोप घेतल्यानंतर अभिजीत खांडकेकर वेगवेगळ्या भूमिकांमध्ये पाहायला मिळत आहे.

## बुम बुम बोंबला'वर डान्स!



गेल्या काही दिवसांपासून 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' कार्यक्रमातील कलाकार नवनवीन चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीस येत आहेत. लवकरच प्रसाद खांडेकर दिग्दर्शित 'चिकी चिकी बुबूम बुम' चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या चित्रपटात अभिनेता स्वप्नील जोशी, प्राजक्ता माळी, प्रार्थना बेहेरे, प्रथमेश शिवलकर, रोहित माने, वनिता खरात अशी तगडी कलाकार मंडळी पाहायला मिळणार आहेत. सध्या या चित्रपटातील एक गाणं खूप चर्चेत आहे. त्याच गाण्यावर प्राजक्ता माळी आणि मृण्मयी देशपांडेने जबरदस्त डान्स केला आहे.अभिनेत्री प्राजक्ता माळी आणि मृण्मयी देशपांडेचा हा जबरदस्त डान्स व्हिडीओ प्राजक्ताच्या फॅन पेजवर शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओमध्ये प्राजक्ता गुलाबी रंगाच्या नऊवारीमध्ये तर मृण्मयी केशरी रंगाच्या नऊवारीत दिसत आहे. दोघी मराठमोळ्या लूकमध्ये खूपच सुंदर दिसत आहेत.या व्हिडीओमध्ये प्राजक्ता व मृण्मयी 'चिकी चिकी बुबूम बुम' चित्रपटातील 'बुम बुम बोंबला' गाण्यावर डान्स करत आहेत. या गाण्यातील हुकस्टेप दोघी करताना दिसत आहेत. प्राजक्ता व मृण्मयीचा हा डान्स व्हिडीओ सध्या खूप चर्चेत आला आहे.प्राजक्ता माळी व मृण्मयी देशपांडेच्या या डान्स व्हिडीओवर अनेक चाहत्यांच्या प्रतिक्रिया उमटल्या आहेत. आतापर्यंत एक लाखांहून अधिक जणांनी हा व्हिडीओ पाहायला आहे. तसंच पाच हजारांहून अधिक जणांनी हा व्हिडीओ लाइक केला आहे.दरम्यान, २८ फेब्रुवारीला प्रदर्शित होणाऱ्या 'चिकी चिकी बुबूम बुम' चित्रपटात अभिनेत्री नम्रता संभेरावचा कॅमिओ आहे. या कॅमिओबद्दल नम्रता म्हणाली होती, ""चिकी चिकी बुबूम बुम' चित्रपटात माझा छोटा कॅमिओ आहे. अवघ्या चार वाक्यांची भूमिका आहे. ही छोटी भूमिका खूप मोठा परिणाम करते. तर आता मी वेगळं काम केलं आहे, जे चार वाक्यात संपणार आहे. पण अत्यंत महत्वाचं काम केलंय. प्रसादचे मला मनापासून आभार मानायचे आहेत.गेल्या काही दिवसांपासून 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' कार्यक्रमातील कलाकार नवनवीन चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीस येत आहेत.

## कालीधर लापता' ते 'होमबाउंड'

काही उत्तम चित्रपटांना बॉक्स ऑफिसवर, ओटीटीवर फारसा प्रतिसाद मिळत नाही. मात्र, या चित्रपटांची कथा, गाणी आणि कलाकारांचा अभिनय हा कमाल असतो. आज आपण २०२५ मध्ये प्रदर्शित झालेल्या अशा सात चित्रपटांबद्दल जाणून घेऊ...द मेहता बॉईजची कथा अमयभोवती फिरते. अमय त्याच्या आईच्या निधनाच्या दुःखातून सावरत असतो. अशा परिस्थितीत त्याला त्याच्या वडिलांबरोबर ४८ तास राहावे लागते. त्यांच्याबरोबर राहणे अमेयला अजिबात आवडत नाही.या चित्रपटात बोमन इराणी आणि अविनाश तिवारी प्रमुख भूमिकेत आहेत. हा चित्रपट प्राइम व्हिडिओवर उपलब्ध आहे.कालीधर लापताची कथा एका मध्यमवयीन व्यक्तीची आहे. ज्याला एक आजार असतो. त्याचे कुटुंब त्याची संपत्ती घेऊन त्याची जबाबदारी झटकून टाकण्याचा विचार करते. त्यासाठी त्याला एका जत्रेत घेऊन जातात आणि त्याला सोडून देतात. जेव्हा त्याचे कुटुंब त्याच्याबद्दल काय विचार करते, हे जेव्हा त्या व्यक्तीला समजते, तेव्हा तो स्वतःच त्यांच्यापासून दूर होतो. यामध्ये अभिषेक बच्चन, निमरत कौर आणि दैविक बाघेला प्रमुख भूमिकेत आहेत. हा चित्रपट ZEE5 वर उपलब्ध आहे.द डिप्लोमॅट ही कथा एका भारतीय राजनैतिक अधिकाऱ्यावर आधारित आहे. तो जबरदस्तीने लग्न लावून दिलेल्या एका महिलेची सुटका करण्यासाठी सीमापार एक अत्यंत धोकादायक मोहिम राबवतो. तणावपूर्ण राजकारण आणि जीवघेण्या परिस्थितीतून वाट काढत ही मोहीम पुढे जाते.होमबाउंड ही उत्तर भारतातील एका छोट्याशा गावातील दोन मित्रांची आहे. या चित्रपटात ईशान खट्टर, विशाल जेठवा आणि जान्हवी कपूर प्रमुख भूमिकेत आहेत.

## पलाश मुच्छल- स्मृती मानधनाचे मोडले लग्न

दरवर्षी बॉलीवूडमध्ये नवनवीन गोष्टी घडतात. नवीन चित्रपट प्रदर्शित होतात,त्यातील काही फ्लॉप होतात, तर काही गाजतात. कलाकारांच्यादेखील चर्चा होतात. कधी व्यावसायिक तसेच अनेकदा खासगी आयुष्यामुळे हे कलाकार चर्चेत येतात. अनेकदा ते वादाच्या भोवऱ्यातदेखील अडकतात. बॉलीवूड अभिनेता सैफ अली खान याच्यावर हल्ला झाला होता. वांद्रे (पश्चिम) येथील त्याच्या घरात घुसून एका दरोडेखोराने त्याच्यावर हल्ला केला होता. या हल्ल्यात तो जखमी झाला होता. गुरुवारी मध्यरात्री अडीच वाजताच्या सुमारास तो त्याच्या कुटुंबियांसह घरात झोपला असताना ही घटना घडली. ही घटना जानेवारीमध्ये घडली होती.गायक पलाश मुच्छल आणि भारतीय क्रिकेटर स्मृती मानधना यांचे २३ नोव्हेंबरला लग्न होणार होते. गेल्या अनेक वर्षांपासून ते एकमेकांना डेट करत होते. मात्र, ज्या दिवशी लग्न



होणार होते, त्यावेळी असे जाहीर केले की लग्न पुढे ढकलले गेले आहे. त्यानंतर एक पोस्ट शेअर करत लग्न मोडले असल्याचे त्यांनी जाहीर केले. मात्र, लग्न का मोडले याबद्दल याबद्दल त्यांनी खुलासा केला नाही.२२ एप्रिल २०२५ ला पहलगाम हल्ला झाला. यामध्ये २६ लोकांनी जीव गमावला. या हल्ल्यानंतर पाकिस्तानी कलाकारांवर बंदी घातली होती. जे कलाकार बॉलीवूड चित्रपटांमध्ये काम करत होते, त्यांच्यावर बंदी घातली होती.दीपिका पादुकोण ही बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री आहे. तिने काही दिवसांपूर्वी कामाचे ठराविक तास असावेत, आठ तासांची शिफ्ट असावी, अशी मागणी केली होती. अनेक रिपोर्टनुसार ती याच कारणांमुळे 'कल्की २८९८ एडी'चा दुसरा भाग आणि 'स्पिरिट' या चित्रपटातून बाहेर पडली आहे. दीपिकाने मागणी केल्यानंतर इंडस्ट्रीमधील अनेक कलाकारांनी यावर विविध मते मांडली आहेत.'हेरा फेरी' या चित्रपटाच्या दोन भागांनी प्रेक्षकांचे भरपूर मनोरंजन केले आहे. यामध्ये अक्षय कुमार, सुनील शेट्टी आणि परेश रावल प्रमुख भूमिकेत दिसले होते.

धोनी यशस्वी कर्णधार

## माजी क्रिकेटपटूने एमएस धोनीबद्दल केला खुलासा

# धोनीमुळे करिअर उदध्वस्त झालं

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**माजी भारतीय लेग-स्पिनर अमित मिश्रा यांनी एमएस धोनीच्या कर्णधारपदामुळे त्यांची कारकीर्द उद्ध्वस्त झाली अशा अफवांना फेटाळून लावले. माजी लेग-स्पिनरने मेन्सएक्सपी यूट्यूब चॅनलवरील पॉडकास्टमध्ये एमएस धोनीबद्दल स्पष्टपणे सांगितले. अनेकांचा असा विश्वास आहे की जर धोनी कर्णधार नसता तर अमित मिश्रा भारतासाठी अधिक सामने खेळला असता.**

### सामना बदलणारा गोलंदाजीचा स्पेल





तथापि, माजी गोलंदाज म्हणाला की जर धोनी कर्णधार नसता तर त्याला कदाचित खेळण्याची संधीही मिळाली नसती. मिश्राने माजी भारतीय कर्णधार एमएस धोनीला त्याच्या आंतरराष्ट्रीय पुनरागमनाचे श्रेय दिले.लोक म्हणतात की जर धोनी कर्णधार नसता तर माझी कारकीर्द चांगली झाली असती. पण कोणाला माहित आहे, त्याच्याशिवाय मला संघात संधीही मिळाली नसती. मी त्याच्या नेतृत्वाखाली खेळलो. मी पुनरागमन केले. तो फक्त त्याने मला कर्णधारपद देण्यास सहमती दर्शविली म्हणून. म्हणून, आपण गोष्टींकडे सकारात्मकतेने पाहिले पाहिजे? अमित मिश्राने २००३ मध्ये भारतासाठी एकदिवसीय, २००८ मध्ये कसोटी आणि २०१० मध्ये टी-२० मध्ये पदार्पण केले. लेग-स्पिनरने २२ कसोटी, ३६ एकदिवसीय आणि १० टी-२० मध्ये भारतीय संघाचे प्रतिनिधित्व केले, ज्यामध्ये अनुक्रमे ७६, ६४ आणि १६ विकेट्स घेतल्या.मिश्राने भारतासाठी खेळताना धोनीने त्याला कशी मदत केली हे सांगितले. मिश्राने न्यूझीलंडविरुद्धच्या त्याच्या शेवटच्या एकदिवसीय सामन्याची आठवण केली, जिथे त्याने धोनीच्या सल्ल्यानुसार १८/५ अशी शानदार गोलंदाजी कामगिरी केली. मिश्रा म्हणाला, "मला धोनीचा पाठिंबा होता. जेव्हा मी प्लेइंग इलेव्हनचा भाग होतो, तेव्हा असा कधीही वेळ नव्हता जेव्हा धोनीने मला टिप्स दिल्या नाहीत. तो मला नेहमी गोष्टी सांगत होता. मी न्यूझीलंडविरुद्ध खेळत होतो, जी माझी शेवटची एकदिवसीय मालिका होती. धोनी कर्णधार होता."

तो एक कठीण सामना होता. मी गोलंदाजी करण्यासाठी आलो होतो. आम्ही २६० किंवा २७० धावा केल्या होत्या. मी धावा थांबवण्यावर लक्ष केंद्रित केले आणि विकेट घेण्याचा विचार केला नाही.तो पुढे म्हणाला, "काही षटकांनंतर, धोनी माझ्याकडे आला आणि म्हणाला की मी माझ्या नैसर्गिक पद्धतीने गोलंदाजी करत नाही. त्याने मला जास्त विचार करू नकोस आणि मी नेहमी करतो ते करायला सांगितले. मी तेच केले आणि एक विकेट मिळाली. तो म्हणाला, 'ही तुझी गोलंदाजी आहे. अशी गोलंदाजी कर. जास्त विचार करू नकोस.' तो सामना बदलणारा गोलंदाजी स्पेल होता. मी पाच विकेट घेतल्या. मला वाटते की तो माझा सर्वोत्तम गोलंदाजी स्पेल देखील होता. त्याला वाटले की जर मी विकेट घेतल्या नाहीत तर आपण सामना गमावू. अशा प्रकारे त्याने मला पाठिंबा दिला."अमित मिश्राने सप्टेंबर २०२५ मध्ये सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. त्याने १६२ आयपीएल सामने खेळले, ज्यामध्ये १७४ विकेट घेतल्या. अमित मिश्राने आयपीएलमध्ये तीन हॅटट्रिक देखील घेतल्या.

### मला धोनीचा पाठिंबा होता

आंतरराष्ट्रीय पुनरागमनाचे श्रेय दिले.लोक म्हणतात की जर धोनी कर्णधार नसता तर माझी कारकीर्द चांगली झाली असती. पण कोणाला माहित आहे, त्याच्याशिवाय मला संघात संधीही मिळाली नसती. मी त्याच्या नेतृत्वाखाली खेळलो. मी पुनरागमन केले. तो फक्त त्याने मला कर्णधारपद देण्यास सहमती दर्शविली म्हणून. म्हणून, आपण गोष्टींकडे सकारात्मकतेने पाहिले पाहिजे? अमित मिश्राने २००३ मध्ये भारतासाठी एकदिवसीय, २००८ मध्ये कसोटी आणि २०१० मध्ये टी-२० मध्ये पदार्पण केले.

एमएस धोनी हा भारताच्या सर्वात यशस्वी कर्णधारांपैकी एक आहे. त्याने त्याच्या नेतृत्वाखाली अनेक खेळाडूंना भरभराटीस आणण्यास मदत केली आहे.माजी भारतीय लेग-स्पिनर अमित मिश्रा यांनी एमएस धोनीच्या कर्णधारपदामुळे त्यांची कारकीर्द उद्ध्वस्त झाली अशा अफवांना फेटाळून लावले. माजी लेग-स्पिनरने मेन्सएक्सपी यूट्यूब चॅनलवरील पॉडकास्टमध्ये एमएस धोनीबद्दल स्पष्टपणे सांगितले. अनेकांचा असा विश्वास आहे की जर धोनी कर्णधार नसता तर अमित मिश्रा भारतासाठी अधिक सामने खेळला असता. तथापि, माजी गोलंदाज म्हणाला की जर धोनी कर्णधार नसता तर त्याला कदाचित खेळण्याची संधीही मिळाली नसती.

# भारतीय महिला क्रिकेटर वैष्णवी शर्माचे पदार्पण

## वडिलांनी दाखवली कुंडली, क्रिकेटर बनविण्याचा घेतला निर्णय

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय महिला क्रिकेट संघ आणि श्रीलंकेच्या महिला क्रिकेट संघामधील पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिला सामना २१ डिसेंबर रोजी विशाखापट्टणम येथे खेळवण्यात आला. एसीए-व्हीडीसीए क्रिकेट स्टेडियमवर भारताने हा सामना ८ विकेट्सने जिंकला. या सामन्यात डावखुरी फिरकी गोलंदाज वैष्णवी शर्मने भारताकडून पदार्पण केले.**







२० वर्षीय डावखुरी फिरकी गोलंदाज असणाऱ्या वैष्णवीने तिच्या पदार्पणात कोणतीही विकेट घेतली नाही, परंतु तिने ४ च्या इकॉनॉमी रेटने गोलंदाजी करताना फक्त १६ धावा दिल्या.वैष्णवी ही मध्य प्रदेशातील ग्वाल्हेरची आहे आणि ती भारतीय संघात निवड झालेली चंबळ प्रदेशातील पहिली महिला क्रिकेटपटू आहे. तिला अलीकडेच २०२२-२३ ज्युनियर डोमेस्टिक हंगामात सर्वोत्तम महिला क्रिकेटपटू म्हणून जगमोहन दालमिया ट्रॉफी देण्यात आली. वैष्णवी शर्मने वयाच्या ५ व्या वर्षी क्रिकेट खेळण्यास सुरुवात केली आणि ग्वाल्हेरमधील तानसेन क्रिकेट अकादमीमध्ये सराव केला. तिने तासन्तास सराव केला आणि यश मिळवण्यासाठी कठोर परिश्रम केले. वैष्णवीचे वडील ज्योतिषी आहेत आणि ग्वाल्हेरच्या जीवाजी विद्यापीठात प्राध्यापक आहेत. त्यांनी त्यांच्या मुलीच्या कुंडलीचा अभ्यास केला आणि तिच्या वैद्यकीय आणि क्रीडा क्षेत्रातील प्रतिभेची ओळख पटवली. त्यानंतर त्यांनी तिला खेळावर लक्ष केंद्रित करण्यास प्रोत्साहित केले. या वर्षाच्या सुरुवातीला महिला तिने विश्वचषकात अपवादात्मक कामगिरी केली आणि १७ विकेट्स घेत स्पर्धेत सर्वाधिक विकेट्स घेणारी गोलंदाज बनली.

### विश्वचषकात सर्वाधिक विकेट्स

वैष्णवीने वरिष्ठ महिला टी-२० ट्रॉफीमध्ये २१ विकेट्स आणि वरिष्ठ महिला आंतर-विभागीय टी-२० मध्ये १२ विकेट्स घेतल्या. भारत आणि श्रीलंका यांच्यातील पाच सामन्यांची टी-२० मालिका २१ डिसेंबरपासून सुरू होईल आणि ३० डिसेंबर रोजी संपेल. भारतीय संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरने रविवारी वैष्णवीला पदार्पणाचा शिबिर दिला.

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज™
ePaper
। मंगळवार ।
दि. 23 डिसेंबर 2025
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## माजी नगरसेवक संदीप वाघेरे राष्ट्रवादीत

# अजित पवारांचा भाजपवर पलटवार!

### पिंपरी-चिंचवड महापालिकेची आगामी निवडणूक स्वबळावर लढविण्याची तयारी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय जनता पक्षकडून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षातील माजी नगरसेवकांना पक्षात घेतल्यानंतर आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपवर पलटवार केला आहे. पिंपरीगावातील भाजपचे माजी नगरसेवक संदीप वाघेरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात प्रवेश केला आहे.**




पिंपरी-चिंचवड महापालिकेची आगामी निवडणूक स्वबळावर लढविण्याची तयारी असलेल्या भाजप आणि राष्ट्रवादी (अजित पवार) यांच्यात माजी नगरसेवकांची फोडाफोडी जोरात सुरू झाली आहे. काही दिवसांपूर्वी अजित पवार यांनी भाजपच्या स्थायी समितीच्या माजी अध्यक्षांसह दोन माजी नगरसेविकांना राष्ट्रवादीत प्रवेश दिला होता. त्यानंतर भाजपने राष्ट्रवादी (अजित पवार) तसेच शिवसेना (ठाकरे) पक्षाला मोठा धक्का देत विविध पक्षांतील १७ माजी नगरसेवकांना भाजपमध्ये सामील करून घेतले होते. यामध्ये ठाकरे सेनेचे शहरप्रमुख, राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन माजी उपमहापौर आणि तीन माजी स्थायी समिती अध्यक्षांचा समावेश होता.

दरम्यान, पूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये असलेले आणि अजित पवार यांचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जाणारे संजोग वाघेरे यांनी ठाकरे गटाच्या शिवसेनेतून भाजपमध्ये प्रवेश केला. संजोग वाघेरे आणि पिंपरीगावातील भाजपचे माजी नगरसेवक संदीप वाघेरे हे कट्टर राजकीय विरोधक मानले जातात. संजोग वाघेरे आणि त्यांच्या पत्नी, स्थायी समितीच्या माजी अध्यक्षा उषा वाघेरे यांचा भाजपमध्ये प्रवेश झाल्यानंतर संदीप वाघेरे नाराज झाले होते.

"आपल्याला विश्वासात न घेता संजोग वाघेरे यांना पक्षात घेतले गेले. आम्ही दोघे एकाच पक्षात राहू शकत नाही," अशी स्पष्ट भूमिका संदीप वाघेरे यांनी घेतली होती. कार्यकर्त्यांचा मेळावा घेऊन पुढील निर्णय जाहीर करणार असल्याचेही त्यांनी सांगितले होते. अखेर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत संदीप वाघेरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात प्रवेश करत मनगटावर घड्याळ बांधले. यावेळी राष्ट्रवादीचे निवडणूक प्रमुख नाना काटे उपस्थित होते.

संदीप वाघेरे हे प्रभाग क्रमांक २१ पिंपरीगाव अंतर्गत अशोक थिएटर परिसर, वैष्णवीदेवी मंदिर, मासूळकर पार्क, जिजामाता हॉस्पिटल आणि मिलिंदनगर या भागातून इच्छुक असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या प्रवेशामुळे पिंपरी-चिंचवडमधील राजकीय समीकरणे पुन्हा एकदा तापण्याची शक्यता आहे.

---

## महापालिका निवडणुकीचा महासंग्राम आजपासून सुरू

### इच्छुक उमेदवारांना सकाळी 11 ते दुपारी 3 वाजेपर्यंत दाखल करता येणार नामनिर्देशन पत्रे

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ साठी उमेदवारांच्या नामनिर्देशन पत्रे दाखल करण्याची प्रक्रिया मंगळवार, दि. २३ डिसेंबर २०२५ पासून सुरू होत आहे. ही प्रक्रिया निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत पार पडणार आहे, अशी माहिती आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी दिली आहे.**





निवडणूक प्रक्रिया सुलभ, पारदर्शक आणि नियमानुसार पार पडावी यासाठी महापालिकेच्या ८ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये स्वतंत्र निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालये सुरू करण्यात आली आहेत. संबंधित क्षेत्रीय कार्यालयांमध्ये उमेदवारांना प्रभागनिहाय नामनिर्देशन पत्रे ३० डिसेंबर २०२५ पर्यंत ऑफलाईन पद्धतीने दाखल करता येणार आहेत. तर अंतिम दिवशी सकाळी ११ ते दुपारी २ पर्यंत उमेदवार नामनिर्देशन पत्रे घेऊन जाऊ शकतात. यासाठी प्रत्येक कार्यालयात आवश्यक प्रशासकीय यंत्रणा, कर्मचारी तसेच तांत्रिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी ३१ डिसेंबर २०२५ रोजी होणार असून उमेदवारी माघारीसाठी २ जानेवारी २०२६ ही तारीख निश्चित करण्यात आली आहे. चिन्ह वाटप आणि अंतिम उमेदवारांची यादी ३ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे. महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. तर १६ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे

नामनिर्देशन पत्रांची छाननी, वैधता तपासणी, उमेदवारी मागे घेण्याची प्रक्रिया आणि अंतिम उमेदवार यादी जाहीर करण्याचे सर्व टप्पे निवडणूक आयोगाच्या घोषित कार्यक्रमानुसार राबविण्यात येणार आहेत. उमेदवारांनी आणि राजकीय पक्षांनी नामनिर्देशन प्रक्रियेसाठी ठरवून दिलेल्या वेळेचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

याशिवाय, नामनिर्देशन पत्रे दाखल करताना उमेदवारांनी निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार आवश्यक कागदपत्रे, प्रतिज्ञापत्रे तसेच अनिवार्य शुल्क वेळेत सादर करणे आवश्यक आहे. नामनिर्देशन प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर नियमांचे काटेकोर पालन केले जाणार असून, कोणतीही त्रुटी आढळल्यास संबंधित नामनिर्देशन बाद होऊ शकते, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी, असे महापालिकेच्या वतीने सांगण्यात आले आहे.

## माऊली मळा, शरदनगर परिसरातील जनसंवाद रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

# नागरिकांचा विश्वास सार्थ ठरवणार-निशा यादव

### प्रभाग क्रमांक 11 मध्ये महिला आणि ज्येष्ठ नागरिकांचा निशा यादव यांना पाठिंबा



। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**प्रभाग क्रमांक 11 मधील माऊली मळा शरदनगर परिसरात निशा दिनेश यादव यांच्या नेतृत्वाखाली आयोजित जनसंवाद रॅलीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. रॅलीदरम्यान घरोघरी भेट देत नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यात आल्या. भाजपा नेते, आमदार श्री. महेशदादा लांडगे यांच्या नेतृत्वाखाली या प्रभागातील विकासासाठी ठोस प्रयत्न करणार असून नागरिकांचा विश्वास सार्थ ठरवणार आहे अशी ग्वाही या रॅलीमध्ये इंद्रायणी महिला प्रतिष्ठान अध्यक्ष निशा यादव यांनी दिली.**

या जनसंवाद रॅलीत घरोघरी पत्रक वाटप करण्यात आले. माता भगिनींकडून प्रेमळ औक्षण करण्यात आले तर ज्येष्ठ नागरिकांनी आशीर्वाद दिले. तरुणांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला. नागरिकांचा विश्वास हीच माझी ताकद असल्याची भावना यावेळी निशा यादव यांनी व्यक्त केली.

**महिला भगिनींना निशा यादव यांच्या नेतृत्वावर विश्वास**

इंद्रायणी महिला प्रतिष्ठानच्या अध्यक्षा निशा दिनेश यादव यांना प्रभाग क्रमांक 11 मधून मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळत असून रॅलीमध्ये महिलांची लक्षणीय उपस्थिती त्यांच्या विजयाच्या विश्वासाची पोचपावती देणारी ठरली. महिलांनी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सभागृहात आपले प्रभावी प्रतिनिधित्व निशा यादव यांच्या माध्यमातून व्हावे असा निर्धार व्यक्त केला त्यांच्या माध्यमातून प्रभागातील महिलांचे प्रश्न सुटतील असा विश्वासही महिलांनी व्यक्त केला.

**ज्येष्ठांनी दिला आशीर्वाद**

ज्येष्ठ नागरिकांनीही निशा यादव यांना उत्स्फूर्त पाठिंबा देत रॅलीत सक्रिय सहभाग घेतला. प्रभाग क्रमांक 11 मधील ज्येष्ठ नागरिक संघाला वेळोवेळी निशा यादव आणि दिनेश यादव यांचे सहकार्य लाभले असून आगामी काळात ज्येष्ठ नागरिक संघाच्या विविध कार्यक्रमांसाठी महापालिकेच्या योजनांचा पाठपुरावा त्यांच्या माध्यमातून होईल असा विश्वास ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त केला.

> जनसंवाद रॅलीमधून नागरिक युवक, महिलावर्ग आणि ज्येष्ठ नागरिकांचा वाढता विश्वास दिसून आला. हा उस्फुर्त प्रतिसाद मनोबल वाढवणारा आहे. नागरिकांचा विश्वास आगामी काळात नक्कीच सार्थ ठरवू. भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून शहराला विकासाची उंची गाठता येणार आहे हे नागरिकांनी देखील ओळखले आहे. आरोग्य, शिक्षण, वाहतूक, पाणी व्यवस्थापन या सर्व गोष्टींसाठी भाजपचे "व्हिजन" डोळ्यासमोर ठेवून काम करू.
>
> **—निशा दिनेश यादव,**
> अध्यक्ष, इंद्रायणी महिला प्रतिष्ठान

---

## उद्योगाभिमुख शिक्षणातून विद्यार्थ्यांना उज्ज्वल करिअरची दिशा

### डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड इनोव्हेशनचे कॅम्पस प्लेसमेंटमध्ये उल्लेखनीय यश

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**डॉ. सुशांत पाटील ग्रुप अंतर्गत कार्यरत असलेल्या डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड इनोव्हेशन या महाविद्यालयाने कॅम्पस प्लेसमेंटच्या माध्यमातून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न व एआयसीटीई मान्यताप्राप्त असलेल्या या संस्थेतील विद्यार्थ्यांची थिंक टेक इंडिया या नामांकित कंपनीत निवड झाली आहे.**




कॉम्प्युटर इंजिनिअरिंग आणि एआय-डीएस (आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स) विभागातील एकूण १३ विद्यार्थ्यांची वार्षिक ५.५ लाख रुपये पॅकेजसह तसेच १५ हजार रुपये मासिक स्टायपेंडवर निवड झाली आहे. हे यश महाविद्यालयातील दर्जेदार शिक्षण, उद्योगाभिमुख प्रशिक्षण आणि सातत्यपूर्ण मार्गदर्शनाचे फलित असल्याचे बोलले जात आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागातील वैष्णवी देसाई, साक्षी आढाव, दीक्षा देशमाने, ज्योती जाधव, प्रीतम कुमार, शिवम कुमार, विनोद कुमार, मोहन कडमबांडे, जयेश पाटील आणि महेश सुभम यांचा समावेश आहे. तर एआय-डीएस विभागातील ओम बाम्बळे, वेदांत चौधरी आणि ऋतुजा पाटील या विद्यार्थ्यांनीही यश मिळवले आहे.

या यशामागे संस्थेचे मार्गदर्शक डॉ. सुशांत पाटील आणि ॲड. अनुजा पाटील यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे उद्योगांशी दृढ संबंध प्रस्थापित झाले असून विद्यार्थ्यांसाठी उज्ज्वल करिअरच्या संधी निर्माण झाल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर त्यांचा विशेष भर असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश माळी यांच्या शैक्षणिक नेतृत्वामुळे, योग्य नियोजनामुळे आणि विद्यार्थ्यांना दिलेल्या सातत्यपूर्ण प्रोत्साहनामुळे हे यश शक्य झाले आहे.

तसेच सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलने विद्यार्थ्यांना आवश्यक कौशल्य प्रशिक्षण देत या निवड प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावली. हे यश केवळ विद्यार्थ्यांच्या मेहनतीचेच नव्हे, तर संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणपद्धतीचे आणि विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी असलेल्या कटिबद्धतेचे द्योतक असल्याचे महाविद्यालय प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

> **“आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पदवी नव्हे, तर उद्योगांच्या गरजांशी सुसंगत कौशल्ये आत्मसात करणे अत्यंत आवश्यक आहे. आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश त्यांच्या मेहनतीचे, प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाचे आणि संस्थेच्या गुणवत्तापूर्ण, नवोन्मेषात्मक शिक्षणपद्धतीचे फलित आहे. भविष्यातही विद्यार्थ्यांना सर्वोत्तम संधी उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.”**
>
> **– डॉ. सुशांत पाटील**

### कावेरी नगर क्रीडा संकुल येथे जिल्हास्तरीय 'युनिफाईट' स्पर्धा उत्साहात

# युनिफाईट स्पर्धेत न्यू इंग्लिश मीडियम स्कूलचा झेंडा!

## 10 विद्यार्थी सुवर्णपदकासह विभागीय स्तरावर पात्र

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**कावेरी नगर क्रीडा संकुल येथे नुकत्याच संपन्न झालेल्या शालेय जिल्हास्तरीय 'युनिफाईट' स्पर्धेत न्यू इंग्लिश मीडियम स्कूलच्या खेळाडूंनी आपल्या कौशल्याचा जबरदस्त ठसा उमटवला. या स्पर्धेत शाळेच्या एकूण २५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता, त्यापैकी १० विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदकावर आपले नाव कोरले आहे. विजेत्यांची दैदीप्यमान कामगिरी जिल्हास्तरीय स्पर्धेत न्यू इंग्लिश मीडियम स्कूलच्या खालील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले:**

प्रथम क्रमांक (सुवर्णपदक): उत्तम भाटी, धनराज जाधव, कार्तिक गावडे, कार्तिक सूर्यवंशी, ऋषिकेश हाके, हर्षित तिवारी, अजिंक्य सुर्वे, भाग्यश्री गायकवाड, चिन्मय मस्के आणि असावरी राऊत. (या सर्व विद्यार्थ्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

द्वितीय क्रमांक: श्याम माळी, पृथ्वी रोडे, श्रमण मनोहर.

तृतीय क्रमांक: रईस अत्तार, रिजवान अत्तार.

यासोबतच सिद्धी लोखंडे, समृद्धी मांजरे, श्रावणी माने, हर्षदा लोखंडे, आराध्या पत्रीगडे, अजय मगर, रेहान शेख, तेजस्वत बोडके, अथर्व क्षीरसागर आणि ज्ञानेश्वर करचे या विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सक्रिय सहभाग नोंदवत उत्तम खेळ केला.

**मान्यवरांकडून कौतुकाचा वर्षाव**

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष विजय पवार, सचिव अशोक मोरे, खजिनदार सुरेखा पवार व संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका विद्या नाईक व नायगम अग्नीस यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मुलांचे भरभरून कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. पिंपरी चिंचवड महानगरपालिका तसेच पुणे क्रीडा विभागाचे काकड सर व क्रीडा पर्यवेक्षक दीपक कणेरे यांनी देखील विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल आनंद व्यक्त केला. या सर्व विद्यार्थ्यांना शाळेचे क्रीडा शिक्षक यशवंत माने व संदीप माने यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.



# DR. SUHAS KAMBLE JOINS BJP, EXPRESSES WILLINGNESS TO CONTEST PCMC ELECTIONS

## JOINS BHARATIYA JANATA PARTY UNDER THE LEADERSHIP OF MLA MAHESH LANDGE

**PIMPRI-CHINCHWAD:** RENOWNED ORTHOPAEDIC SURGEON AND SOCIAL WORKER DR. SUHAS KAMBLE HAS FORMALLY JOINED THE BHARATIYA JANATA PARTY (BJP) UNDER THE LEADERSHIP OF MLA SHRI MAHESH LANDGE. DR. KAMBLE HAS EXPRESSED HIS WILLINGNESS TO CONTEST THE PIMPRI CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION (PCMC) ELECTIONS 2025–26 FROM WARD NO. 8 AS AN INTERESTED ASPIRANT.

DR. KAMBLE IS THE FOUNDER OF SAINATH HOSPITAL, BHOSARI, AND HAS BEEN SERVING THE PEOPLE OF PIMPRI-CHINCHWAD AND SURROUNDING REGIONS THROUGH DEDICATED HEALTHCARE SERVICES FOR SEVERAL DECADES. WITH A STRONG BACKGROUND IN PUBLIC SERVICE AND HEALTHCARE, HE STATED THAT HIS DECISION TO ENTER POLITICS STEMS FROM A DESIRE TO CONTRIBUTE MORE EFFECTIVELY TO SOCIETY.




### ENTRY INTO POLITICS FOR SOCIAL SERVICE:

AFTER YEARS OF SERVICE IN THE MEDICAL FIELD, DR. KAMBLE HAS TAKEN A STEP TOWARD PUBLIC LIFE WITH THE INTENTION OF ADDRESSING CIVIC ISSUES AND CONTRIBUTING TO OVERALL DEVELOPMENT.

### INTEREST IN CONTESTING FROM WARD NO. 8:

DR. KAMBLE HAS EXPRESSED HIS WILLINGNESS TO CONTEST THE UPCOMING PCMC ELECTIONS FROM WARD NO. 8, WHICH INCLUDES JAY GANESH SAMRAJYA, JALVAYU VIHAR, KENDRIYA VIHAR, PMRDA SECTOR 12, SANT NAGAR, MAHARASHTRA COLONY, INDRAYANI NAGAR, KHANDEWASTI, GAWALIMATHA, BALAJI NAGAR, AND NEARBY AREAS.

### FOCUS ON DEVELOPMENT AND TRANSPARENCY:

HIS VISION INCLUDES STRENGTHENING HEALTHCARE FACILITIES, IMPROVING SANITATION AND CIVIC INFRASTRUCTURE, ENSURING TRANSPARENCY IN DEVELOPMENT WORKS, AND CREATING A SAFE ENVIRONMENT FOR WOMEN, SENIOR CITIZENS, AND YOUTH.

### QUOTE BY DR. SUHAS KAMBLE:

"FOR DECADES, I HAVE SERVED SOCIETY AS A DOCTOR, STANDING WITH PEOPLE IN THEIR MOST DIFFICULT MOMENTS. TODAY, I FEEL A DEEPER RESPONSIBILITY TO CONTRIBUTE BEYOND HEALTHCARE. UNDER THE GUIDANCE OF RESPECTED LEADERS, I WISH TO WORK FOR TRANSPARENT GOVERNANCE, SUSTAINABLE DEVELOPMENT, AND THE WELL-BEING OF EVERY CITIZEN." DR. KAMBLE APPEALED TO CITIZENS FOR THEIR SUPPORT AND BLESSINGS AS HE BEGINS THIS NEW JOURNEY OF PUBLIC SERVICE.






Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!

8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046